दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
VADAL VARTA
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● सोमवार २४ जून २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक ३१६ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# सत्तेत असताना रेल्वे अंबळनेर पर्यंत धावली ; सत्तेत नसताना रेल्वे परळी पर्यंत धावेल का ?

## स्वातंत्र्य मिळून ७७ वर्ष झाली ; अंबाजोगाईला मात्र रेल्वे आलीच नाही

**अंबाजोगाई/प्रतिनिधी**

देशाला स्वातंत्र्य मिळून ७७ वर्षे झाली. अंबाजोगाईला मात्र अद्याप रेल्वे आलीच नाही. नागरिकांनी अनेक वेळा मागणी केली, शासन दरबारी निवेदने दिली. अंबाजोगाईला रेल्वे मार्ग व्हावा, यासाठी येथील जनता पन्नास वर्षांपासून मागणी करीत आहे. केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्यासाठी लोकप्रतिनिधीची इच्छा शक्ती कमी पडत आहेत की काय अशी चर्चा होताना दिसत आहे. येथील दोन लोकप्रतिनिधी केंद्रीय मंत्री झाले. परंतु, त्यांनी अंबाजोगाई रेल्वे मार्गाकडे दुर्लक्ष केले. सामाजिक कार्यकर्ते भारत पसारकर यांनी अनेकवेळा केंद्रीय रेल्वे मंत्र्यांना नागरिकांच्या स्वाक्षरीचे निवेदने पाठविली, हजारों पोस्टकार्ड पाठविली, पाठपुरावा केला. तत्कालीन केंद्रीय राज्यमंत्री जयसिंग गायकवाड यांनी त्यांच्या कार्याची दखल



घेऊन त्यांच्या घरी जाऊन सत्कार केला होता. माजी खासदार कॉ.गंगाधरअप्पा बुरांडे यांनी घाटनांदूर-अंबाजोगाई या आठरा किलोमीटर रेल्वे मार्गाची मागणी दिल्लीच्या लोकसभेत केली होती. त्यावर रेल्वे मंत्र्यांनी केवळ अश्वासन दिले होते. स्थानिक लोकप्रतिनिधींचा पाठपुरावा कमी पडत असल्याचा आरोप नागरिक करीत आहेत.



घाटनांदूर - अंबाजोगाई या रेल्वे मार्गाचा सर्व्हे झाला. परंतू, प्रत्यक्ष काम झाले नाही. त्यानंतर घाटनांदूर- अंबाजोगाई-केज-पाटोदा-जामखेड- दौंड असा रेल्वे मार्गाचा सर्व्हे करण्यात आला. मात्र, बजेटअभावी कामे रेंगाळली. अंबाजोगाई - गुलबर्गा या नवीन रेल्वे मार्गाची मागणी माजी प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे यांनी



लाऊन धरली होती.अंबाजोगाई पत्रकारांनी माजी खा.प्रीतमताई मुंडे यांना रेल्वे मागणी संदर्भात दोनद निवेदन दिले. रेल्वे मार्गासाठी गटबाजी व पक्षभेद विसरून सर्व नागरिकांनी एकत्रित येऊन नवीन रेल्वे मार्गाची मागणी करण्याची खरी गरज आहे. पंतप्रधान, रेल्वे मंत्री, रेल्वे राज्यमंत्री, बीड लोकसभेचे खा. बजरंग सोनवणे, खा. रजनी पाटील यांच्याकडे भेटून निवेदने देऊन पाठपुरावा करण्याची गरज आहे. अंबाजोगाई परिसरात नवीन रेल्वे मार्ग सुरु झाल्यास शहराचा सर्वांगिण विकास होणार आहे. व्यापारपेठ, भौतिक विकास, उद्योगधंदे व पर्यटन क्षेत्राला चालना मिळेल, युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, शहराच्या आधुनिकीकरणाला प्रारंभ होईल. अंबाजोगाई सारख्या ग्रामीण भागात साध्या रेल्वे सेवा उपलब्ध नसल्याची खंत वाटते त्यामुळे बीड जिल्ह्याच्या माजी खासदार प्रितमताई मुंडे या “सत्तेत असताना रेल्वे “अंबळनेर” पर्यंत धावली तर खासदार बजरंग सोनवणे सत्तेत नसताना रेल्वे “ परळी “ पर्यंत धावेल का ? अशी चर्चा बीड जिल्ह्यातील जनतेत होत आहे.

## हिंगणी बु. जि प शाळेतील शिक्षकाच्या रिक्त जागा भरण्याची मागणी.

किल्ले धारूर/प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील हिंगणी बुद्रुक येथील जि प शाळांमध्ये चार जागा रिक्त असून यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत आहे या रिक्त जागा भराव्यात अशी मागणी सरपंच योगेश सोळंके यांनी केली आहे.

धारूर तालुक्यातील हिंगणी बुद्रुक येथील जि प शाळेमध्ये सध्या पदवीधरांच्या तीन जागा व एक डी एड शिक्षकाची जागा रिक्त असून या जागा रिक्त असल्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणीक नुकसान होत आहे. यामुळे हे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी तात्काळ येथील रिक्त जागा भराव्यात अशी मागणी येथील सरपंच योगेश सोळंके यांनी शिक्षण विभागास निवेदनाद्वारे केली आहे ,एक जुलै च्या त्या रिक्त जागा न भरल्यास पालकासह एकत्रित आंदोलन छेडण्याचा इशारा शिक्षण विभागास निवेदना द्वारे देण्यात आला आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा,किल्ले धारूर उभारणी प्रकरणी बाळराजे आवारे पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांना जामीन मंजूर.

**किल्ले धारूर/प्रतिनिधी**

धारूर येथे दिनांक १४ जून रोजी पहाटे छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा गनिमी कावा करत उभा केल्याप्रकरणी छत्रपती संभाजी महाराज शौर्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळराजे आवारे पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांना अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालय,केज यांनी जामीन मंजूर केला. किल्ले धारूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा १४ रोजी पहाटे छत्रपती संभाजी महाराज शौर्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळराजे आवारे पाटील व त्यांच्या सहकाऱ्याच्या वतीने उभा केला होता.



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे स्वप्न गेल्या ३५ वर्षांपासून प्रलंबित होते हे स्वप्न छत्रपती संभाजी महाराज शौर्य प्रतिष्ठान यांच्या पुढाकारातून साकार झाले. या सर्व प्रकरणी धारूर पोलिसांनी पोलीस स्टेशन धारूर येथे गु.र.नं.१७६/२०२४ विविध कलमानुसार गुन्हा दाखल केला होता. सर्वजन पोलिसासमोर स्वतः समर्पण करून अटक झाले होते. आरोपींनी जामिनासाठी अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालय,केज येथे जामीन अर्ज दाखल केला होता. मा.अतिरीक्त सत्र न्यायालय, केज यांनी सर्व आरोपींना प्रत्येक २५०००/- (पंचवीस हजार रुपये) जात मुचलक्यावर जामीन मंजूर केला.जामीन मिळाल्यामुळे किल्ले धारूर शहरातील सर्व समाजातील नागरिकांमध्ये आनंदी आणि उत्साही वातावरण असून, सर्व मावळांच्या किल्ले धारूर शहरात आगमनाची प्रतीक्षा होत आहे. तसेच या बाळराजे आवारे पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांना या जामीनाकामी धारूरकरांनी त्यांच्या न्यायालयीन प्रक्रियेमध्ये भरपूर असे सहकार्य केले तसेच धारूर न्यायालयातील नामवंत वकील बांधवांनी आरोपींच्या वतीने काम पाहिले.





भ्रष्टाचार निर्मूलन समिती च्या 26 व्या वर्धापन दिनानिमित्त मुंबई येथील कार्यक्रम दरम्यान विविध विषयांवर चर्चा करून शुभेच्छा देताना जिल्हाध्यक्ष परमेश्वर सोळंके, अमर साळवे बाळासाहेब आडागळे



पाथर्डी येथील कर्तव्यदक्ष पीएसआय निवृत्ती आगरकर यांची भेट घेऊन शुभेच्छा देताना पत्रकार परमेश्वर सोळंके अमर साळवे बाळासाहेब आढागळे राम यादव शेख अखिल

## सेकंडरी स्कूल चिरनेर दहावी १९८५ ग्रुपने वृक्षारोपण करून सर्वांना दिला पर्यावरण संरक्षणाचा संदेश.



**उरण/विठ्ठल ममताबादे**

सेकंडरी स्कूल चिरनेर दहावी १९८५ ग्रुपचे यावर्षीचे पावसाळी गेट टू गेदर रविवार दिनांक २३ जून २०२४ रोजी बापूजी मंदिर चिरनेर परिसरात मोठ्या उत्साहात संपन्न झाले.नोकरीनिमित्ताने बाहेरगावी असलेले मित्र यावेळी आवर्जून उपस्थित होते. शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा मिळाला.बालपणीचा काळ सुखाचा होता असेही मत काहींनी व्यक्त केले. या ग्रुप मधील अनेकांनी अतिशय कठीण परिस्थितीत कष्ट करून शिक्षण घेतले .या ग्रुपकडून बापूजी मंदिर परिसरात आंबा आणि करंज वृक्षांची लागवड करण्यात आली.वृक्षारोपण करून इतर पर्यावरणप्रेमींना देखील हा चांगला संदेश देण्यात आला. त्याचबरोबर ही झाडे जगविण्यात येतील ही हमी त्यांनी दिली.पर्यटकांकडून या परिसरात प्लास्टिक बाटल्या आणि प्लास्टिक पिशव्या टाकल्या जातात . त्यादेखील उचलून या परिसराची साफसफाई करण्यात आली. यापुढील प्रत्येक गेट टू गेदर आणि सहलीत किमान एकतरी सामाजिक ,शैक्षणिक आणि ऐतिहासिक उपक्रम राबवायचा असे ठरविण्यात आले. या ग्रुप कडून प्रत्येक सहलीत छत्रपती शिवाजी महाराजांचा एक किल्ला पाहिला जातो.आता येणाऱ्या सहलीत छत्रपती शिवाजी महाराज यांचे जन्मस्थान असलेला शिवनेरी किल्ला पहायचे सर्वानुमते ठरवण्यात आले. या गेट टू गेदर ला ग्रुप ॲडमिन मिलिंद खारपाटील, चंद्रहास म्हात्रे, सुर्यकांत म्हात्रे, पद्माकर फोफेरकर,प्रकाश फोफेरकर ,प्रकाश नारंगीकर, पंढरीनाथ नारंगीकर, सुरेश केणी,रोहिदास पाटील, सुभाष पाटील, दिपक म्हात्रे,राजेंद्र मुंबईकर, विजय पाटील, उपकार ठाकूर, प्रभाकर ठाकूर,रवींद्र पाटील,विजय मुंबईकर हे १७ वर्गमित्र उपस्थित होते.घरी परतताना सर्वांनी साश्रू नयनांनी एकमेकांचा निरोप घेऊन येत्या किल्ले शिवनेरी सहलीत सर्वांनी एकत्र भेटण्याचा निर्धार व्यक्त केला.

संपादकीय

## विधवांना उजळमाथ्यांनी जगू द्याहो!

(आंतरराष्ट्रीय विधवा दिन विशेष.)

आज सशस्त्र संघर्ष, विस्थापन आणि स्थलांतर आणि कोविड-१९ साथीच्या आजारामुळे हजारो स्त्रिया नव्याने विधवा झाल्या आहेत आणि इतर अनेक ज्यांचे जीवनसाथी हरवले आहेत किंवा गायब झाले आहेत. विधवांचे अनोखे अनुभव आणि गरजा समोर आणल्या पाहिजेत, त्यांच्यासोबत मार्ग दाखवणारे आवाज बुलंद केले पाहिजेत. भारतात स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीने समान दर्जा देण्यासाठी अनेक संघटना आणि समाजसुधारक कार्य करत आहेत. मात्र भारतातील विधवांच्या प्रश्नाकडे डोळेझाक करण्यात येत असल्याचा आरोप होत राहतो.

विधवांना त्यांचे हक्क आणि न्याय मिळवून देण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाच्या वतीने २३ जून हा दिन आंतरराष्ट्रीय विधवा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. तेव्हा जाणून घेऊया काय आहे विधवा दिनाचा इतिहास, महत्व आणि उद्देश याबाबतची माहिती. काय आहे विधवा दिनाचा इतिहास? कोणत्याही स्त्रिला आपल्या जोडीदार निवडण्याचा अधिकार आहे. मात्र काही कारणास्तव त्यांचा जोडीदार गमावल्याने अशा महिलांना एकाकी आयुष्य जगावे लागते. त्यामुळे विधवा महिलांचे प्रश्न मोठे भयंकर आहेत. विधवा महिलांचा प्रश्न फक्त भारतातच नाही, तर जगभरात गंभीर होत चालला आहे. त्यासाठी गेल्या सात वर्षापासून यूकेची लूम्बा फाउंडेशन ही संस्था जगभरातील विधवा महिलांवर होणाऱ्या अत्याचाराविरोधात संयुक्त राष्ट्रांमध्ये मोहीम राबवत आहे. विधवांचे प्रश्न बिकट झाल्याने संयुक्त राष्ट्र संघाने २३ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय विधवा दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

काय आहे विधवा दिन साजरा करण्याचा उद्देश? जागतिक पातळीवर विधवा महिलांचे प्रश्न भयंकर असल्याने संयुक्त राष्ट्राने २३ जून हा आंतरराष्ट्रीय विधवा दिन साजरा करण्याचे जाहीर केले. त्यानुसार दरवर्षी विधवा दिनाचे औचित्य साधून या दिवशी विधवा महिलांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतात. जगभरातील विधवा महिलांची स्थिती सुधारावी, त्यांना इतर महिलांसारखे सामान्य जीवन जगता यावे यासाठी जागतिक पातळीवर प्रयत्न करण्यात येतात. इतर सामान्य महिलांसारखे त्यांना समान हक्क मिळण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघ प्रयत्न करते. मात्र आपण कितीही प्रगत झालो, तरी विधवा महिलांकडे पाहण्याचा आपला दृष्टीकोन बदलत नाही. जागतिकीकृत पातळीवर विधवा महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. पती नसल्याने कुटूंब त्यांच्याकडे विशेष लक्ष देत नाही. तर कधी विधवा महिलांना वाऱ्यावर सोडले जाते. यामुळे जगभरातील लाखो विधवा महिला गरिबी, हिंसाचार, बहिष्कार, बेघरपणा, आजारी आणि समाजातील भेदभाव सहन करतात. विधवाविवाहास आपण सर्वपरीने प्रोत्साहन आणि आटोकाट प्रयत्न केले पाहिजे. जगभरातील ११५ दशलक्ष विधवांना गरिबीत जगण्यास भाग पाडले जाते. तर ८१ दशलक्ष महिलांना शारीरिक शोषणाचा सामना करावा लागत असल्याचे विविध अहवालातून स्पष्ट झाले आहे. जागतिक पातळीवर विधवा महिलांच्या न्याय हक्काचा प्रश्न गंभीर झाला आहे. त्यात भारतातही विधवा महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो.

# प्रत्येक विद्यार्थ्यांनी अधिकाऱ्याचे स्वप्न ठेवावेत - पी आय मच्छिंद्र सुरवसे

## बाळनाथ विद्यालय चाकरवाडी मध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा समारंभ संपन्न...

बीड प्रतिनिधी - बीड तालुक्यातील बाळनाथ विद्यालय या शाळेमध्ये सुरवसे परीवार आणि मित्र मंडळ यांच्या वतीने चाकरवाडीतील दहावी उत्तीर्ण, एनएमएमएस परीक्षेत यशस्वी आणि वेग वेगळ्या क्षेत्रात उंच भरारी घेतलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. सुरवसे परीवाराचे तसेच चाकरवाडी गावचे भूषण असणारे पी आय मच्छिंद्र सुरवसे साहेब आणि मित्र मंडळ यांनी या कार्यक्रम आयोजीत केला होता. यावेळी प्रा. फाटक सर, ह . भ.प बाळनाथ महाराज, नेकनूर पोलीस स्टेशनचे प्रभारी एपीआय चंद्रकांत गोसावी साहेब, पीएसआय नितीन गट्टूवार, पीएसआय अर्चना सुरवसे, आदर्श पोलीस पाटील नानासाहेब काकडे, उपसरपंच लखन अनवणे, माजी सरपंच छत्रभुज पवार, सामाजिक कार्यकर्ते ज्ञानोबा अनवणे, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक कांबळे सर, बाळनाथ विद्यालयाचे मुख्याध्यापक जगताप सर आणि दोन्ही शाळेचे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाची सुरूवात ही दिप प्रज्वलन करुन सुरूवात झाली. दिप प्रज्वलन झाल्यानंतर प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक जगताप सर यांनी केले प्रास्ताविकादरम्यान बाळनाथ विद्यालयातील वर्षातून कमीत कमी चार ते पाच विद्यार्थी नोकरीला लागतात असे यावेळी बोलताना शाळेचे मुख्याध्यापक म्हटले आहेत. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहीलेले पी एस आय नितिन गट्टूवार साहेब यांनी बोलताना म्हटले विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा साजरा करणे म्हणजे विद्यार्थ्यांना एक प्रोत्साहन देणे होय. दहावी झाल्यानंतर हा आपला टर्निंग पॉईंट असतो, इथुन पुढे आपल्याला काय करायचे हे स्वतः ठरवायचं असते, ज्या क्षेत्रात आपल्याला आवड असते त्याच क्षेत्राची निवड करुन त्याच क्षेत्रात जावे असे सुध्दा यावेळी बोलताना म्हटले. आदर्श पोलीस पाटील नानासाहेब काकडे पाटील यांनी बोलताना सांगितले की चाकरवाडी ची बाळनाथ विद्यालय ही शाळा परिसराचे भूषण आहे. पी एस आय सुरवसे मॅडम विद्यार्थ्याना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यानी आपल्या मनामध्ये आजच ठरवा आपली जागा कुठे असावी, आपले ध्येय आजच ठरवा, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करणे म्हणजे विद्यार्थ्यांचा मनामध्ये अभ्यासाची ओढ लागणे होय. शाळेचा माजी विद्यार्थी बालाजी अनवणे हा बोलताना टॅलेंट तर सर्वच विद्यार्थ्यांमध्ये असते पण ते बाहेर काढण्याच कार्य ते गुरू करत असतात असे यावेळी बोलताना म्हटले. तसेच पुढे कार्यक्रमासाठी उपस्थित असलेले नेकनुर पोलीस स्टेशन चे ए पी आय चंद्रकांत गोसावी साहेब यांनी बोलताना फुल रुपाने उबावणारे हे विद्यार्थी आहेत. चाकरवाडी परिसरात माझी निवड झाली हे माझं पूर्वी जन्मीचे पुण्य आहे. माझी सेवा ही माऊली दादांच्या परिसरामध्ये घडते. शाळेचा जर इतिहास पहिला तर खूपच चांगला आहे. आता पर्यंत या शाळेतून जवळपास शंभर विदयार्थी नोकरी साठी घडले आहेत. माझ्या



गावात एकही घर नसेल की त्यागावात नोकरदार नाही. प्रत्येक घरामध्ये एक नोकरदार आहेच. तुम्हाला उच्च शिखरावर नेऊन सोडण्यासाठी शिक्षक आहेत तसेच हा कार्यक्रम ज्यांनी आयोजीत केला ते पी आय मच्छिंद्र सुरवसे यांनी बोलताना एका कार्यक्रमातून पाच विदयार्थी जर यशस्वी झाले तर आपला कार्यक्रम यशस्वी झाला असे म्हणतो. ज्ञानाच्या कप्प्यामध्ये काहीतरी पडले पहिजे या साठी कार्यक्रम ठेवला जातो. प्रत्येक विद्यार्थ्यांनी अधिकाऱ्याचे स्वप्न ठेवावेत. आपले मित्र आणि मैत्रिणी चांगले बनवा, जीवनात आपले मित्र मंडळी चांगले बनवावा हा संदेश विद्यार्थ्यांना सुरवसे साहेब यांनी दिला. मुले घडविण्याचे काम हे आई वडिलांनंतर शिक्षक करतात असा संदेश यावेळी विद्यार्थ्यांना दिला. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषणात प्रा. फाटक सर विद्यार्थी हे फुलणारी उमलानारी आणि देशाचे आधारस्तंभ असणारी पिढी आहे. विद्यार्थी हे उद्याचे जबाबदार नागरिक आहेत. अश्या कार्यक्रमामुळे विद्यार्थी चांगल्या पद्धतीने विकसित झाली पाहिजेत. मनात जिद्द आणि चिकाटी असली की विदयार्थी कुठेही पोहचवू शकतो. जीवनामध्ये चांगला मित्र असने फार महत्त्वाचा आहे. मित्र हा माणसाला चांगला घडवण्याचे काम असते. मित्राची जागा ही आता मोबाईल ने घेतली आहे. या सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मांजरे सर यांनी केले. या प्रसंगी बाळनाथ विद्यालयाची परंपरा कायम दिसुन आली आहे. या वर्षी शाळेचा निकाल हा 100 टक्के लागलेला आहे. या वेळी शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. प्रत्येक विद्यार्थ्यांचा शाल, हार, नारळ, सन्मान चिन्ह देऊन स्वागत केले. विद्यार्थ्यांबरोबर आई वडिलांचा सुद्धा सत्कार सोहळा केला.शाळेमधून प्रथम संस्कार नेमीनाथ शेळके, द्वितीय अंजली बाबुराव अनवणे , तृतीय धनश्री साहेबराव माने ,सावंत क्षितिजा कानिफनाथ , अनवणे सानिका विजयकुमार ,मोरे सार्थक नवनाथ ,मोरे अंजली मोहन, जगताप अभिजीत समाधान,पायाळ समीक्षा सतिश, जोशी वैष्णवी तुकाराम , सावंत पल्लवी रामचंद्र, सस्ते गीतांजली लक्ष्मण, मानसी अशोक सुरवसे, चव्हाण प्रतीक्षा सुधाकर, वैष्णवी अनिल हजारे तसेच दहावी च्या वर्गातील सर्वच गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ करण्यात आला. तसेच एनएमएमएस परीक्षेत उत्तीर्ण आणि पात्र झालेल्या विद्यार्थ्यांचा आणि आई वडिलांचा सत्कार करण्यात आला. या मध्ये, सान्वी गणेश तांदळे, उर्मिला शंकर चव्हाण, प्रियंका गोवर्धन कांदे, श्रुती कदम, शिवम भारत शेळके, विश्वजित नितीन मोरे इतर विद्यार्थी एनएमएमएस परीक्षेत उत्तीर्ण झाल्या बद्दल त्यांचा सन्मान यावेळी करण्यात आला. तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील सर्वच विषयात हुशार असलेल्या तेजस ज्ञानेश्वर दाईंगडे आणि प्रगती कांतीलाल पवार या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला आहे. आणि शाळेतील कार्यक्रमास उपस्थित राहिलेल्या माजी विद्यार्थ्यांपैकी विविध पदांवर काम करत असलेल्या विलास ककडे ग्रामसेवक, नागेश अनवने , गजानन अनवने, महेश पवार, राहुल घोडके फौजी, बालाजी अनवणे यांचा सुद्धा यावेळी सत्कार करण्यात आला आणि शाळेतील माजी विद्यार्थी या वर्षी पोलीस भरती मध्ये भरती झाले होते त्यांच्या आई वडिलांचा यावेळी सन्मान करण्यात आला. यामध्ये पोलिस खात्यामध्ये भरती झालेल्या विद्यार्थ्याच्या आई वडिलांचा सत्कार यावेळी करण्यात आलेला आहे. पोलीस घडवण्यामध्ये आई वडिलांचा सगळ्यात मोठा वाटा असतो. गणेश भाऊसाहेब हजारे आणि नानासाहेब अरुण सुरवसे या विद्यार्थ्यांच्या आई वडिलांचा सत्कार करण्यात आला. तसेच आता नुकताच NEET या परीक्षेचा निकाल जाहिर झाला या परीक्षेमध्ये आदित्य मच्छिंद्र सुरवसे याने 601 गुण घेतले त्या बद्दल त्यांचा आणि आई वडिलांचा सर्व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

# नाशिकमधील काळाराम मंदिर प्रकरणात पत्र काढणाऱ्यास अटक, आरोपीकडून चार मोबाईल, दोन लॅपटॉप जप्त केले आहे



**नाशिक/प्रतिनिधी**
नाशिकमधील काळाराम मंदिराच्या परिसरात आक्षेपार्ह पत्रके वाटण्यात आले होते. या पत्रकारावर काळाराम मंदिर आसपास असणाऱ्या विशिष्ट समाजातील लोकांना मंदिरात प्रवेश वर्ज्य असल्याचे म्हटले होते. त्यावरून राज्यात मोठा गदारोळ निर्माण झाला होता. नाशिकमध्ये शनिवारी (२२ जून) पंचवटी परिसरात चार तास तणावाचे वातावरण होते. या प्रकरणात गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्टीकरण दिले आहे. हे पत्र प्रसिद्ध करणाऱ्या व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. दुसऱ्या व्यक्तीशी असलेल्या वैमनस्यातून हा प्रकार केला गेल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. काय म्हणाले देवेंद्र फडणवीसमाध्यमांशी नाशिकमधील प्रकाराबाबत बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, त्या पत्रासंदर्भात सर्व माहिती पोलिसांनी काढलेली आहे. काळाराम मंदिराच्या आसपास राहणाऱ्या लोकांना धमकी देणारे पत्र काढण्यात आले होते. ते पत्र पब्लिश प्रसिद्ध करणाऱ्या व्यक्तीला अटक करण्यात आलेली आहे. दुसऱ्या व्यक्तीशी असलेल्या वैमनस्यातून हे पत्र काढले गेले आहे. हे पत्र काढणारा व्यक्ती अनुसूचित जातीचाच आहे. त्यामागे काय कारण आहे, हे शोधले जात आहे. आरोपीकडून चार मोबाईल, दोन लॅपटॉप जप्तआरोपीकडून चार मोबाईल, दोन लॅपटॉप जप्त केले आहे. त्या व्यक्तीच्या पाठिशी कोण आहेत? दंगल घडवण्यासाठी त्याने हे पत्र काढले आहे का? ज्याच्या नावाने पत्र काढले, त्याच्याशी त्याचे काय वैर होते. त्या व्यक्तीला बदनाम करण्यासाठी त्याने पत्र काढले आहे का? या सर्व प्रश्नांची चौकशी नाशिक पोलीस करत आहे. हे पत्र काढून पत्र सोशल मीडियावर टाकायचे आणि लोकांमध्ये गैरसमजुती निर्माण करून दंगा घडवण्याचे प्रयत्न यापुढेही होऊ शकतात. त्याकडे पूर्ण लक्ष ठेवून आम्ही आहोत. राजकीय नेत्यांचे टोचले कान काही राजकीय नेत्यांनी हे पत्र ट्विट केले. राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसच्या नेत्याकडून हा प्रकार झाला. त्यावर बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, या प्रकारात शहानिशा न करता वस्तुस्थिती न तपासता तसे पत्र व्हायरल केल्यास समाजात तेढ निर्माण होईल. यामुळे राजकीय नेत्यांनी आपली सामाजिक जबाबदारी ओळखली पाहिजे,

## अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या प्रेरणेने सिद्धेश्वर मंदिर कव्हे या ठिकाणी प्रवचन सोहळा संपन्न...

**सोलापूर/विश्वास चोपडे**
अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या कृपाआशीर्वादाने व प. पू. कानिफनाथ महाराज यांच्या प्रेरणेने नाम गजर व प्रवचन सोहळा रविवार दि २३/०६/२०२४ रोजी सिद्धेश्वर मंदिर कव्हे ता. माढा येथे आयोजित केला होता. या कार्यक्रमामध्ये गुरू पूजन:-११. ०० ते ११. ३०वा झाला नाम गजर:-११. ३० ते २. ३० वा झाला प्रवचन सेवा १.०० ते २. ३० वा ज.न.म. प्रवचनकार सौ.



शोभा ताई दत्तात्रय बेलदार) यांचे शुश्राव्य असे प्रवचन झाले.अखिल भारतीय हिंदू संग्राम सेना जिल्हा सोलापूर एक दिवस मैत्रीचा कार्यक्रम घेण्यात आला त्यानंतर सांगता आरती झाली. तदनंतर महाप्रसाद घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली. सर्व गुरुबंधू-गुरुभगिनी यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद द्विगुणीत केला.हे आयोजन माढा तालुका सेवा समिती व कव्हे येथील गुरुबंधू-गुरुभगिनी यांनी केले होते.

## जेष्ठ गायक व संगीतकार धयाळकर यांना पुरस्कार प्रदान !

व




नुकताच मुंबईत प्रा सुरेंद्र गावस्कर सभागृहात दादर येथे "कोकण दीप २२वा वर्धापन" दिनानिमित्त जेष्ठ गायक व संगीतकार एकनाथ धयाळकर यांना संगीत क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बद्दल प्रसिद्ध सिने- नाट्य अभिनेत्री सौ साक्षी नाईक यांच्या हस्ते सन्मानपत्र स्मृतिचिन्ह देऊन 'मुंबई रत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# प्रशांत पाटील यांच्या निधनाने पक्षाची मोठी हानी-शरद पवार



**उरण/विठ्ठल ममताबादे**
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे महाराष्ट्र राज्याचे प्रदेश सरचिटणीस प्रशांत पाटील हे राष्ट्रवादि काँग्रेस पार्टीचे प्रामाणिक व एकनिष्ठ कार्यकर्ते होते.पक्षाला तळागाळात पोहोचविण्याचे काम प्रशांत पाटील यांनी केले असून पक्षासाठी रात्रंदिवस झटणारा कार्यकता पक्षातून गेला त्यामुळे पक्षाला मोठा धक्का बसला आहे. प्रशांत पाटील सारखा सच्चा कार्यकर्त्याच्या निधनामुळे पक्षाची खूप मोठी हानी झाली आहे. असे भावनिक उद्गार राष्ट्रवादि काँग्रेस पार्टीचे संस्थापक तथा,नेते शरदचंद्र पवार यांनी उरण येथे केले.
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार)पक्षाचे प्रदेश सरचिटणीस आक्रमक व धडाकेबाज नेतृत्व असलेले उरणचे सुपुत्र प्रशांत भाऊ पाटील यांचे २० जून २०२४ रोजी आकस्मिक निधन झाले. त्या अनुषंगाने भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे संस्थापक तथा माजी कृषी मंत्री शरदचंद्र पवार व त्यांच्या पत्नी प्रतिभा पवार यांनी उरण शहरातील कामठा येथील प्रशांत भाउ पाटील यांच्या निवास जाउन प्रशांत पाटील यांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले.या प्रसंगी शरद पवार यांनी आपल्या भावना व्यक्त करून प्रशांत पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.यावेळी शरद पवार भावूक झाले होते. प्रशांत पाटील यांनी पक्षासाठी दिलेले योगदान कधीच विसरता येणार नाही. पक्षाच्या प्रत्येक कार्यक्रमात ते पुढे असायचे.त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो. हे दु:ख पचविण्याची परमेश्वर त्यांच्या कुटुंबियांना ताकद देवो या शब्दात शरद पवार यांनी श्रध्दांजली अर्पण केली. या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे महिला प्रदेश सरचिटणीस भावना घाणेकर, महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस संतोष घरत,माजी आमदार मनोहरशेठ भोईर, जेएनपीटीचे विश्वस्त दिनेश पाटील , शेतकरी कामगार पक्षाचे तालुका चिटणीस विकास नाईक,राष्ट्रवादीचे उरण विधानसभा अध्यक्ष - गणेश नलावडे,राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष मनोज भगत,शहराध्यक्ष मंगेश कांबळे, युवक कार्याध्यक्ष समाधान म्हात्रे,युवक अध्यक्ष सचिन पाटील,सामाजिक कार्यकर्ते समीर सुर्वे यांच्यासह प्रशांत पाटील यांच्या पत्नी,मूले, नातेवाईक,मित्र परिवार तसेच सर्वच राजकीय पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.यावेळी उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# विद्यार्थ्यांकडे ज्ञानाचा भांडार असला की ते साता समुद्रा पार जाऊ शकतात-ह.भ.प संजय जमादार

## शहादा येथे गुणवंतांचा मराठा समाज युवा पर्वतर्फे सन्मान

**नंदुरबार/प्रतिनिधी**
मोड येथे मराठा समाज युवा पर्वतर्फे घेण्यात आलेल्या विद्यार्थी गुणगौरव सोहळ्याप्रसंगी ह.भ.प संजय जमादार म्हणाले की, प्रत्येक व्यक्ती हा वाचनाने व परिश्रमामुळेच मोठा होतो विद्यार्थ्यांकडे ज्ञानाचा भांडार असला की ते साता समुद्रापार जाऊ शकता असे प्रतिपादन त्यांनी याप्रसंगी केले. याप्रसंगी नंदुरबार जिल्हाभरातील शेकडो विद्यार्थी- विद्यार्थिनींचा मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज व सरस्वती मातेचे प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. शहादा तालुका मराठा युवा पर्वच्या वतीने दहावी-बारावीच्या परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा व शिक्षण घेऊन विविध क्षेत्रात मोठ्या पदांवर व देशाबाहेर गेलेल्या व्यक्तींचा आणि त्यांच्या आई-वडिलांचा तसेच समाजासाठी योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सत्कार शहरातील अन्नपूर्णा लॉन्समध्ये दि. 23 जून रोजी उत्साहात पार पडला. अध्यक्षस्थानी जिजामाता शिक्षण संस्थेचे सचिव आता राष्ट्रवादीचे नंदुरबार जिल्हाध्यक्ष डॉ.अभिजित मोरे तर प्रमुख अतिथी म्हणून उद्योजक संतोष साळुंखे, हभप संजय जमादार, उद्योजक आनंदराव चौथे, राजेश जाधव, प्रा.ज्ञानेश्वर सोनवणे, पांडुरंग गोरे, प्रा.संभाजीराव काळे,शहादा पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक भुवनेश मराठे, संजय गायकवाड, युवराज जाधव, शांतीलाल गायकवाड, नवनीत शिंदे, माजी नगराध्यक्ष रवींद्र पवार, डॉ.शिरीष परांडे, हरीश हराळे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. प्रस्तावना चंद्रकांत बोराणे केली. याप्रसंगी जिजामाता शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.अभिजीत मोरे, प्रा. ज्ञानेश्वर सोनवणे, ज्येष्ठ पत्रकार लक्ष्मण कदम, राजेश जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा



दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश तट्टे यांनी केले तर आभार सागर मराठे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मराठा युवा पर्वच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले सदर कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला. या सोहळ्याप्रसंगी जिल्हाभरातील विविध क्षेत्रातील मान्यवर पालक आदी उपस्थित होते.

# शासनाकडे दुसरं काम नव्हतं का?; लक्ष्मण हाके यांचं विधान नेमकं काय?

कुणबी या नोंदी असतील. तर त्यांना कोणी रोखू शकत नाही. कारण मंडल आयोगात कुणबी बाय डिफॉल्ट आहेत. कुणबी दाखले रद्द करता येत नाही. पण मराठा लिहिलं त्या पुढे कु लावायचं. कुणबी हा प्रवर्ग वेगळा आहे. खानदेश कुणबी गिर्णा नदीच्या काठावर राहतात, खऱ्या कुणबी यांचं राहणीमान वेगळ आहे. मनोज जरांगे यांना मंडल आयोग कधी



निर्माण झाला काही माहिती नाही. घटनात्मक अधिकार असलेल्या आयोगाला बोलणं म्हणजे पारावरच्या गप्पा आहेत, असं लक्ष्मण हाके यांनी म्हटलं आहे. जर हिंदू कासार ओबीसीतून आरक्षण घेऊ शकतो. तर मुस्लिम कासार पण त्या ठिकाणी जाऊन चौकशी करू शकतो. शासनाकडे दुसरं काम होत का नव्हतं?, हे न्यायचे तत्त्व नाही हे मध्येच घुसवण्याचं तत्त्व आहे. ते हाताने कुणबी लिहिताय. वसंतराव नाईक महामंडळाला निधी मिळत नाही, महाज्योती ला निधी मिळत नाही. आरक्षण एकमेव उपाय नाही. ओबीसीतून आमच्या सारखी माणसं जर पुढे आली तर ही शासनाची माणसं आहेत. मॅनेज आहेत, असं लक्ष्मण हाके म्हणाले.

## बॉलीवूड अभिनेत्री चित्रा दीक्षित व अभिनेता रविशा तेलधुणे खाकी... लय भारी मध्ये...आमने-सामने


कवि सरकार इंगळीशेवगाव पांडुरंग गोरे - दिग्दर्शक पांडुरंग गोरे यांचा आगामी मराठी चित्रपट खाकी... लय भारी देशाच्या दुश्मनासाठी लय.. डेंजर आहे , या मराठी चित्रपट मध्ये मुख्य भूमिकेत पुण्याचे सिने अभिनेता रविशा तेलधुणे यांनी विविध भरपूर चित्रपटांमध्ये भूमिकां केलंय आहे, प्रथमचं ते बॉलीवूड सिने अभिनेत्री चित्रा दीक्षित, यांच्यासमोर फिल्म स्क्रीन पडदा शेअर करतानी आमने-सामने दिसणार आहे ,याची उत्सुकता आता प्रेक्षकांना लागली आहे , या चित्रपटांमध्ये पोलीस वाल्या ,सायकल वाल्या, ब्रेक लावून थांब ...या धर्तीवर, प्रेरित होऊन दिग्दर्शक पांडुरंग गोरे यांनी पुढिल गाणे ची रचना केली आहे, ... टांगमोडे हवालदार आला... तुझ्या जीवाचां मैतर झाला... हे गाणे, धमाल साँग चित्रीत होणार आहे , खाकी.. लय भारी यामध्ये रवीशा तेलधुणे यांची हटकेबाज, कॉमेडी पोलीस कॉन्स्टेब बजरंग टांगमोडे हवालदाराची जबरदस्त भूमिका आहे, अभिनेता रविशा तेलधुणे यांची या भूमिकेसाठी पूर्वतयारी झाली असून बॉलिवूड सिने अभिनेत्री चित्रा दीक्षित समोर भूमिका परफॉर्मन्स करण्याची त्यांच्या मनात सध्या चल बिचल चालू आहे, हा चित्रपट 15 ऑगस्ट पासून चित्रीकरण करण्यास प्रारंभ होणार आहे,

# शिवसेना (ठाकरे) पक्षाच्या वाहतूक संघटनेच्या उरण तालुक्यातील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर.

## माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांच्या शुभहस्ते नियुक्ती पत्रांचे वाटप.

**उरण/विठ्ठल ममताबादे**

भारतीय कामगार संघटनेच्या वाहतूक विभागातर्फे उरण तालुक्यातील वाहतूक संघटनेच्या उरण विधानसभा अध्यक्ष करण चंद्रहार पाटील यांनी नियुक्त्या जाहीर केल्या, त्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे रायगड जिल्हाप्रमुख व माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांच्या शुभहस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले.यामध्ये उरण विधानसभा उपाध्यक्षपदी सौरभ दत्ताराम पाटील, जासई विभाग अध्यक्षपदी अतुल नामदेव मढवी व नवघर विभाग अध्यक्षपदी संतोष नामदेव पाटील यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या, यावेळी माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांनी त्यांना पुष्पगुच्छ देऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या व वाहतूक संघटनेबरोबर शिवसेना



पक्षाचा कार्य पण आपल्या हातून घडावं अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी उरण विधानसभा संपर्कप्रमुख महादेव घरत, द्रोणागिरी शहरप्रमुख जगजीवन भोईर, उरण विधानसभा वाहतूक अध्यक्ष करण पाटील, उरण विधानसभा सोशल मीडिया समन्वयक नितीन ठाकूर, उपशहरप्रमुख प्रतीक पाटील, तालुका उपसंघटिका मनीषा ठाकूर, तालुका उपसंघटिका सुजाता पाटील, शिक्षक नेते कौशिक ठाकूर व शिवसेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.योग्य अशा व्यक्तींची निवड झाल्याने जनतेतून आनंद व्यक्त होत आहे.नवनियुक्त पदाधिकाऱ्यांवर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# वैद्यनाथ आय टी आय हाळम मध्ये प्रवेश सुरु

## आयटी आय रजिस्ट्रेशन करण्यासाठी राहिला शेवटचा सप्ताह

**परळी (प्रतिनिधी)** दयाधर्म सामाजिक प्रतिष्ठान हाळम संचलित श्री वैद्यनाथ आय टी आय कॉलेज हाळम ( डी जी ई टी नवी दिल्ली द्वारा मान्यताप्राप्त) असून हे कॉलेज हाळम ता परळी वैजनाथ जिल्हा बीड) येथे शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करीत प्रवेश प्रक्रिया सुरू असुन एस एस सी परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थी विद्यार्थिनी यांना आता ईतरत्र जाण्यासाठी आवश्यकता नाही आता आपल्या तालुक्यातील हाळम येथील दयाधर्म सामाजिक प्रतिष्ठान हाळम चे संस्थापक अध्यक्ष माधव मुंडे यांनी आय टी आय च्या सर्व सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

परळी- धर्मापुरी रोड बसस्टॉप जवळ हाळम ता परळी वैजनाथ जिल्हा बीड येथे मराठवाड्यात फक्त हाळम येथे असलेला एकमेव ट्रेड १)सोलार टेक्निशियन (१ वर्ष) नोकरीसंधी एम एस ई बी व अन्य विभागामध्ये मोठ्या प्रमाणात नोकरीची संधी , सोलार विज निर्मिती क्षेत्रात,रेल्वे, एअरलाईन, आदिवासी विभाग इत्यादी ठिकाणी १०० टक्के नोकरीची संधी.२) हेल्थ सॅनिटरी इन्स्पेक्टर (आरोग्य निरीक्षक) कालावधी १ वर्ष नोकरीची संधी- आरोग्य निरीक्षक MPW डॉक्टर ,एअरलाईन , केंन्द्र व राज्य सरकारचे स्वास्थ्य विभाग , जिल्हा परिषद, महानगर पालिका, पर्यावरण विभाग, रेल्वे विभाग, इत्यादी ठिकाणी १०० टक्के नोकरीची संधी. ३) इलेक्ट्रीशियन (विजतंत्री) कालावधी २ वर्ष नोकरीसंधी महावितरण,महापारेषण, महाजनको, महिंद्रा,टाटा,बजाज विमानाचा कारखाना ,DRDO माझगाव डाक , आदी ठिकाणी नोकरीची १०० टक्के शासकीय नोकरी संधी. ४) वायरमन( तारतंत्री) कालावधी २ वर्ष नोकरीसंधी - महावितरण, महापारेषण , इंडीयन नेव्ही, औष्णिक वीज निर्मिती केंद्र , महिंद्रा, टाटा, बजाज,होंडा ल्युमिनस, आदी ठिकाणी नोकरीची १०० टक्के शासकीय नोकरी संधी आजच आपल्या पाल्याचा प्रवेश निश्चित करा. संस्थेची वैशिष्ट्य दर्जेदार प्रशिक्षण,व अनुभवी निर्देशक , संपुर्ण यंत्रसामग्री सुसज्ज व आधुनिक वर्कशॉप,आय टी आय उत्तीर्ण विद्यार्थीना उच्चशिक्षणाची संधी . उत्कृष्ट निकालाची तसेच अप्रेंटिस ची हमी .संस्थेची वैशिष्ट्य म्हणजे प्रशस्त कॉम्प्युटर लॅब,प्रात्यक्षिकावर विशेष भर. सुसज्जव भव्य इमारत आणि ग्रंथालय सुविधा . सुपरफास्ट इंटरनेटची सुविधा औद्योगिक सहलीचे नियोजन. शंभर टक्के प्लेंसमेंटची हमी देण्यात येते ग्रामीण भागातील विधर्थ्यांना आता दूर कोठेही जाण्याची आवश्यकता नसल्याच मत संस्थेचे अध्यक्ष माधव मुंडे यांनी व्यक्त केले. त्याच्या मार्गदर्शनाखाली वैद्यनाथ आय टी आय चे प्राचार्य व स्टाफ यांनी दिली आहे.



भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या २६ व्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा देताना अलोक द्रीवेदी जिल्हाध्यक्ष परमेश्वर सोळंके अमर साळवे रामराजे यादव सह अखिल शेख

# वसंत महोत्सवात होणार गोरबंजारा उद्योजकांचा सत्कार आणि सन्मान - उद्योजक रामशेठ राठोड

माजलगाव : हरित क्रांतीचे प्रणेते, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, महानायक वसंतराव नाईक साहेब यांच्या जन्ममहोत्सवा निमित्त वसंत महोत्सवाचे राज्यभरात आयोजन करण्यात आले आहे .१ जुलै ते ३१ जुलै दरम्यान होणाऱ्या या वसंत महोत्सवाचा शुभारंभ १ जुलै रोजी सकाळी ११ वाजता माजलगाव (बीड, मराठवाडा) येथे आयोजित करण्यात आला आहे. या वेळी वृक्षारोपण व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच विविध क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार व पुरस्कार अशा कार्यक्रमांचे आयोजन तसेच वसंत व्याख्यान मालिकेचे आयोजन करण्यात आले आहे तसेच यावेळी गोरबंजारा समाजातील उद्योजकांचही सत्कार सन्मान होणार असल्याचे मुंबई येथील उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते रामशेठ राठोड यांनी कळवले आहे. गोरबंजारा सांस्कृतिक प्रदर्शन रॅली, नाशिक ढोल-ताशा, डपडा , महिला नृत्य, घोडा, हत्ती रथ, भजनी मंडळ, असंख्य समाजबांधव, धर्मगुरू यांसोबत महानायक वसंतराव नाईक साहेब यांच्या प्रतिमा रॅलीचे यावेळी आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी गोरधर्म पिठाधीश्वर बाबूसिंग महाराज, गोरधर्म पिठाचे धर्मगुरू महंत जितेंद्र महाराज, धर्मगुरू कबीरदास महाराज, धर्मपीठ प्रवक्ता साहेबराव शात्री महाराज, अनिल महाराज, यांचे सह अनेक यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे भगवंत सेवक किसनभाऊ राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडणार आहे. या कार्यक्रमाचे भव्य आयोजन राष्ट्रीय बंजारा सेवा संघ तर्फे उद्योजक तथा युवा नेते राजेशभैय्या राठोड व उद्योजक रामशेठ राठोड यांनी केले आहे उद्योगपती राजेशभैय्या राठोड यांचा याच दिवशी वाढदिवस असून भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी भव्य रॅलीचे आयोजन केले असून त्यात वेशभूषा परंपरागत थाळी नंगारा नृत्यासह बंजारा महिलांचे सांस्कृतिक कार्यक्रम पाहायला मिळतील ढोल ताशा घोडे, हत्ती व बैलगाडीतून बंजारा समाजाच्या लदेणीची वैभवशाली परंपरा व संस्कृतीचे दर्शन बघायला मिळणार आहे वसंतराव नाईक यांच्या पुतळ्यावर पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे भव्य रॅली मार्ग छत्रपती संभाजी महाराज चौक ते वसंतराव चौक (माजलगाव) असा असणार आहे. रॅलीच्या वेळी शहरात भव्य आतिषबाजी



करण्यात येणार आहे तसेच छत्रपती शिवाजी महाराज व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येणार आहे गोरविचार पीठावरुन बसंतराव नाईक यांच्या जीवनकार्याचा गौरव केला जाणार आहे. महानायक वसंतराव नाईक यांच्या जीवनावर व्याख्यान माला आयोजित केली असून वक्त्यांनी आपली नावे कळवावी असे आवाहन राष्ट्रीय गोरबंजारा सेवा संघातर्फे करण्यात आले आहे वसंतराव नाईक यांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचावे व महानायक वसंतराव नाईक यांच्या विचारांवर समाजाची राजकीय इच्छाशक्ती प्रबळ व्हावी अशी इच्छा आयोजक राजेश राठोड यांनी व्यक्त केली तेरा वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असलेल्या महानायक वसंतराव नाईक यांच्या कार्यापासून प्रेरणा घेत गोरबंजारा समाजाने आता राजकीय क्षेत्रात उतरले पाहिजे व मोठ्या प्रमाणात जिल्हापरिषद पंचायतसमिती ते विधानसभेपर्यंत बंजारा समाजाचा आवाज घुमला पाहिजे असे मत भगवंतसेवक किसनराव राठोड यांनी व्यक्त केलेया कार्यक्रमांसाठी संपूर्ण राज्यातील प्रमुख लोकांची उपस्थिती असणार आहे यासाठी गुणवंत विद्यार्थ्यांनी आपली नावे कळवावी व्याख्यान मालेमध्ये भाग घेणाऱ्या वक्त्यांनी आपली नावे कळवावी आणि विविध उपक्रमांसाठी समाजबांधवांनी आपली नावे कळवावीत असे आवाहन सुद्धा रामशेठ राठोड यांनी केले १ जुलै २०२४ रोजी सकाळी ११ वाजता कार्यक्रमाचा शुभारंभ होईल ११ ते १ वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न होईल १ वाजता नाईक साहेबांच्या प्रतिमेचे पूजन धर्मगुरूंच्या हस्ते सन्मान पुरस्कार व स्नेहभोजन असे आयोजन असेल , दुपार पासून व्याख्यान माला सुरू होईल. सायंकाळी ५ वाजता विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी कार्यक्रमाची रंगत वाढवली जाईल. सायंकाळी ७ वाजता राज्यभर जयंतीमहोत्सव साजरे करण्यासाठी, वसंतराव नाईक यांच्या कार्याचा प्रकाश दूरवर पसरण्यासाठी भव्य आतिषचाजीचे आयोजन करण्यात आले आहे साधारणतः सायंकाळी ७ वाजता भव्य आतिषबाजी करून कार्यक्रमाची सांगता करण्यात येणार आहे युवा उद्योजक राजेशभैय्या राठोड यांचा वाढदिवस येथे केक कापून साजरा केला जाणार आहे या कार्यक्रमाचा उत्साह संपूर्ण मराठवाड्यातून दिसून येत आहे या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रीय बंजारा सेवा समितीचे पदाधिकारी तथा आयोजक राजेश राठोड व उद्योजक रामशेठ राठोड यांनी यावेळी केले आहे.

# सांची बुद्ध विहारात जेष्ट पौर्णीमा उत्साहात साजरी

माजलगाव प्रतिनिधी.

तथागत भगवान बुद्धांच्या जिवनात वर्षाच्या बारा पौर्णीमांना महत्व आसुन प्रत्येक पौर्णिमा बौद्ध बांधव विविध ठीकाणी उत्साहात साजरी करत आसतात याच प्रमाणे सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येथे भारतीय बौद्ध महासभा तालुका - शाखा माजलगांव च्या वतीने जेष्ठ पोर्णिमा साजरी करण्यात आली .या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा तालुका अध्यक्ष आद.गुलाबराव धाईजे हे होते तर या कार्यक्रमा साठी भारतीय बौद्ध महासभा जिल्हा बीड पुर्व चे संस्कार उपाध्यक्ष एस.बी . मोरे ,जिल्हा संस्कार सचिव श्यामभाऊ वाघमारे ,जिल्हा पर्यटन सचिव काशीराम साळवे ,एन. बी राजभोज, जिल्हा संघटक बी.सी . डोंगरे हे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणुन वंचित बहुजन आघाडीचे जेष्ठ नेते अंकुश आण्णा जाधव , धम्मानंद साळवे, बहुजन समाज पार्टी चे अभिमन्यु साळवे, हरिभाऊ साळवे,सेलापुरीचे उपसरपंच नाथाजी घडसे हे उपस्थित होते या कार्यक्रमात मान्यवरांनी ज्येष्ठ पौर्णीमेचे महत्व सांगत संस्थेची कार्यपद्धती यासह विविध विषयांवर मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे प्रस्ताविक भारतीय बौद्ध महासभा ता संस्कार सचिव आशाताई मोरे यांनी केले तर , आभार भारतीय बौद्ध महासभेचे बौद्धाचार्य डी पी वाघमारे नाना यांनी मानले तर सत्रसंचलन संस्थेचे ता सरचिटनीस सिद्धार्थ वक्ते यांनी केले या कार्यक्रमा साठी आयु . कांताताई हिरवे, आयु .पंचशीला गायसंमुद्रे ‘ आयु . शशिकला संमुद्रे यांनी भोजन दान दिले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. भागवत साळवे‘ चक्रधर पोटभरे ,डी पी पोटभरे आप्पा ,मोहनराव काकडे बाबासाहेब घनघाव,नितीन डोंगरे , राजभाऊ साळवे तात्यासाहेब साळवे ,भगवान डोंगरे,रामभाऊ डोंगरे ,सटवाजी मस्के,डी. के . संमुद्रे , फुलवरे ,विशाखाताई वाघमारे ,मंदाताई साळवे , रमाताई राजभोज ‘, निलाबाई साळवे ,छायाताई साळवे सह भारतीय बौद्ध महासभा तालुका पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले





दैनिक वादळ वार्ताहे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनूडिजिटल छापन संप् ादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 के ज येथन तू यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित के ले आहे ( वाद के ज / बीड न्यायालय अंतर्गत )